



सायं.दैनिक बीड

# प्रारंभ

संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे






बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ५ वे ■ अंक ३४२ ■ मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ किंमत ३ रुपये ■ पाने-४

Beed (Maharashtra) ■ Years-5 ■ Issu-342 ■ Tuesday, 17 February-2026 ■ Reg.No.L SB/BEED/RNP.269/2026-2028 ■ RNI MAHMAR/2021/81481 ■ Price-3 rupees ■ Pages-4


# कराडच्या घरी काम करणाऱ्या दोघांची नार्कोटेस्ट

## एसआयटीकडून तपास सुरू : आत्तापर्यंत दोनशे लोकांची चौकशी



प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या निर्घृण हत्येला दोन वर्षांहून अधिक काळ लोटला असून, आता या प्रकरणाचा तपास अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. आयपीएस पंकज कुमावत यांच्या नेतृत्वाखालील एसआयटीने आता वैज्ञानिक चाचण्यांवर लक्ष केंद्रित केले असून, मंगळवारी मुंबईच्या न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळेत दोघांची नार्को टेस्ट तर एकाची ब्रेन मॅपिंग चाचणी होणार आहे. तपासात तांत्रिक पुरावे मिळत नसल्याने एसआयटीने वैज्ञानिक चाचण्यांचा आधार घेतला आहे. यापूर्वी तिघांची नार्को चाचणी पूर्ण झाली आहे. मंगळवारी उर्वरित तिघांपैकी दोघांची नार्को आणि एकाची 'ब्रेन मॅपिंग' केली जाणार आहे. याशिवाय, १२ जणांच्या मानसशास्त्रीय तपासण्या पार पडल्या असून, हे सर्वजण या प्रकरणातील महत्त्वाचे साक्षीदार आहेत. या चाचण्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतरच हत्येचे नेमके कारण आणि मारेकऱ्यांचा उलगडा होण्याची शक्यता आहे.

### नार्को टेस्टवाले 'ते' सहा जण कोण?

महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी एसआयटीने सात जणांच्या नार्को टेस्टचा प्रस्ताव पाठवला होता, मात्र त्यापैकी एका संशयिताला लिव्हरचा त्रास असल्याने वैद्यकीय कारणास्तव त्याची तपासणी नाकारण्यात आली. परिणामी, आता सहा जणांच्या चाचणीला परवानगी मिळाली आहे. यातील ज्या पहिल्या तिघांची चाचणी पार पडली, ते सर्वजण महादेव मुंडे यांच्याशी आर्थिक व्यवहाराने जोडलेले होते. तर मंगळवारी होणाऱ्या चाचण्यांमधील दोघे जण वाल्मीक कराड यांच्या घरी कामाला होते आणि तिसरा त्यांचा मित्र असल्याची माहिती समोर येत आहे. एसआयटी आता या नावांचा संबंध कराड यांच्याशी जोडून त्या दृष्टीने तपासाची चक्रे फिरवत आहे, मात्र कराड कुटुंबाने या लोकांशी कोणताही संबंध नसल्याचा दावा यापूर्वीच केला आहे.



## सुभाष सपकाळ यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा.आ. शशिकांत शिंदे यांच्या आदेशानुसार नगर परिषद माजी सभापती श्री. सुभाषराव सपकाळ यांची बीड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून आमदार संदीप भैय्या क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, माजी आमदार सय्यद सलीम यांनी सपकाळ यांना नियुक्तीपत्र प्रदान करून शुभेच्छा दिल्या.



कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुभाषराव सपकाळ यांचे हार्दिक अभिनंदन केले.

बीड शहरातील ज्येष्ठ, अनुभवी नगरसेवक तसेच माजी सभापती असलेले सुभाष सपकाळ हे मागील ▶▶ पान २ वर...

## छत्रपती मल्टिस्टेटचे आरोपी अजुनही फरार का ? ठेवीदार आक्रमक

### २४ फेब्रुवारीच्या मुंबईतील मोर्चासाठी गेवराईतील ठेवीदारांनी आवळली वज्रमुठ

बीड । प्रतिनिधी

बुडीत पतसंस्था व मल्टिस्टेटमधील अडकलेल्या ठेवी परत मिळाव्यात या मागणीसाठी २४ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे काढण्यात येणाऱ्या भव्य मोर्चासाठी ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक प्रा.सचिन भैय्या




उबाळे यांच्या उपस्थितीत रविवारी गेवराईत झालेल्या बैठकीत ठेवीदारांनीही वज्रमुठ आवळली. दरम्यान गेवराईतील बुडित निघालेल्या छत्रपती मल्टिस्टेटचे चेअरमन व संचालक आरोपींना अद्याप अटक का होत नाही. हे आरोपी अजुनही फरार कसे असा संतप्त सवाल ▶▶ पान २ वर...

## बीडमध्ये अंबिका चौक, राजीव गांधी चौकातील सर्व अडथळे तत्काळ हटवा

बीड । प्रतिनिधी

शहरातील अत्यंत वर्दळीचे अंबिका चौक आणि राजीव गांधी चौक येथील वाहतूक कोंडी कमी करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी निर्माण झालेले सर्व प्रकारचे अडथळे तात्काळ हटविण्याच्या सूचना भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड नगरपरिषद प्रशासनाला दिल्या. यासंदर्भात त्यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि संबंधित यंत्रणेसोबत सोमवारी (दि.१६) दोन्ही चौकांची प्रत्यक्ष पाहणी



### भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या बीड नगरपरिषद प्रशासनाला सूचना

केली.

अंबिका चौकातील सुशोभीकरणामुळे वारंवार निर्माण होणारा वाहतुकीचा अडथळा दूर करण्याबरोबरच परिसरातील अतिक्रमणे हटविण्याची गरज आहे. तसेच, राजीव गांधी चौकातील ▶▶ पान २ वर...







# एआय सर्वांसाठी

सन २०२५-२६ पासून भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआय या क्षेत्रात आपले स्थान मजबूत केले. केंद्रीय चौकट जी २०२५ मध्येच निश्चित करण्यात आली होती. तिला आता व्यापक स्वरूप देण्यात आले. दिल्लीच्या भारत मंडपम येथे परिषद भरत आहे. एआय तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ तंत्रज्ञान म्हणून न करता तिचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी आणि विकास करण्याचा उद्देश आहे.

सुरुवातीला या एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी १०,३७१.९२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. या द्वारे एआय संपूर्ण भारतासाठी कसे उपयुक्त ठरेल आणि मूलभूत मॉडेल्स आणि डेटा बेसेसाठी एआय तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरेल हे या परिषदेतून सांगितले जाईल. विषय सर्वसामान्यांना थोडा कळण्यास अवघड आहे. पण यासाठीच परिषद आहे. एआयचा उपयोग करून सामान्यांचे जीवन कसे सुसह्य करता येईल. लोकसमूह, ग्रह आणि प्रगती ही ती सूत्रे आहेत. ज्यांच्या भोवती परिषदेत काम केले जाईल आणि ही सूत्रे समावेशकता, शाश्वत आणि मानवी केंद्रीत एआय या भोवती रचना तयार करण्यात आली.

लोकसमूह याचा अर्थ मानव केंद्रित एआय असून मानवतावादाची सेवा मानवांचे हक्क आणि सार्वजनिक सेवांप्रती सर्व लोकांना अधिकार तसेच विश्वासाची बांधणी करून देता येतो यावर हे सूत्र आधारलेले आहे. एआय समावेशक आणि मानवी प्रतिष्ठा यांना आणि भारतातील सांस्कृतिक वैविध्याचा आदर राखून जपवणूक करेल असे दुसरे सूत्र आहे. आपला ग्रह पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत एआय पद्धतींना अनूकूल राहील असाही उद्देश आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऊर्जा सक्षम तंत्रज्ञान आणि जबाबदारीने वापर करून हवामान कृतींना पाठिंबा देईल अशी लवचिकता प्रदान करेल असे तंत्रज्ञान उभारणे असा आहे. भारतात भरणाऱ्या परिषदेची व्याप्ती इतकी मोठी आहे, की भारत मंडपम येथे भरणाऱ्या परिषदेत २.५ लाख प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. यात परदेशातून फ्रान्सचे ईमॅन्युएल मॅक्रॉन, ब्राझिलचे लुला डासिल्व्हा, स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सँचेझ आदींसह उपस्थित रहाणार आहेत आणि परदेशातून तज्ज्ञ या परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यात सुंदर पिचाई, सेमी कंडक्टर आणि फाईव्ह जी तंत्रज्ञान राबवण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले क्रिस्तियानो एमोन आदींचा समावेश आहे. नवी दिल्लीत सुरू होणारी परिषद ही भारतासाठी अशा प्रकारची पहिलीच परिषद आहे आणि एआय धोक्यांचे कसे व्यवस्थापन करायचे हे शिकवणारी आहे. तसेच नावीन्यपूर्ण संशोधनाला रुळावर व्यवस्थित कसे ठेवायचे याचाही विचार केला जाणार आहे. याची जी चौकट आखली आहे ती एआयचा वापर करताना पक्षपात आणि गैरवापराला आळा घालणे आणि तसे करतानाही भारताचे हेतू जबाबदार एआय व्यवस्थापन करणे यापुरते मर्यादित आहे. या परिषदेतून भारताचा हेतू हा स्पष्ट होतो, की जबाबदार एआय गव्हर्नन्सला आकार देण्याचा आहे. पण यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की एआयच्या मार्गदर्शक तत्त्वे जी आहेत ती आरोग्य, शिक्षण, कृषी आणि वित्त यात कशी उपयोगात आणली जातील यावर विचार करण्याचा आहे. कठोर नियंत्रणाशिवाय चौकटीने सात व्यापक सूत्रे निश्चित केली आणि जी धोरणकर्ते आणि उद्योग या दोघांनाही मार्गदर्शन करतील. यामध्ये विश्वास हा पाया, पीपल फर्स्ट म्हणजे लोक सर्वोपरी, संशोधनापेक्षा संयम महत्त्वाचा आणि समानता आणि जबाबदारी यांचा समावेश आहे. या सूत्रांचा यावर भर आहे, की एआय सिस्टीमनी मानवी निर्णय प्रक्रियेला पाठिंबा दिला पाहिजे आणि तरीही ते पारदर्शक आणि कोणतेही पक्षपात टाळून साध्य करता आले पाहिजे. या परिषदेचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य हे आहे, की सध्याच्या कायद्यावरील अवलंबितता. अधिकाऱ्यांनी सांगितले आहे, की अनेक एआयशी संबंधित धोके हे सध्याच्या कायदेशीर चौकटीत समाविष्ट आहेत आणि त्यात आयटी नियमावली आणि गुन्हेगारी कायदे यांचा समावेश आहे. या मार्गदर्शक तत्वांत असे सांगितले आहे, की एआय डेव्हलपर्स आणि डिप्लॉयर्सकडून काय अपेक्षा आहे. संशोधनाला प्राधान्य देऊन सरकारने केवळ ते एआयचा प्रमुख वापर करणारे नाही तर जबाबदार आणि समावेशक कारभार जो भारताचा २०४७ साली साकार होणारा विकसित भारत दृष्टिकोन साध्य करणारा असेल असे सिद्ध करू पाहत आहे. एआयचा उपयोग विविध कारणांसाठी होतो आणि हेच या परिषदेचे सार आहे. रोजगार, भाषा, नवीन रोजगार मिळवणे, सार्वजनिक सेवा आणि सामान्य लोकांना लाभप्रद होतील अशा योजना राबवणे यासाठी एआयचा उपयोग कसा करता येईल या दृष्टीने या परिषदेत विचार केला जात आहे. ब्रिटनचे उपपंतप्रधान डेव्हीड लॅमी आणि एआय मंत्री कनिष्क नारायण हे भारतात आलेल्या शिष्ट मंडळात आहेत. त्यांनी सांगितले, की एआयचा उपयोग करून रोजच्या जीवनात कसा सामान्याना लाभ करून देता येईल आणि जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात एआयचा उपयोग करून डॉक्टर त्वरीत रोगनिदान करतील, शिक्षक शिकवण्यात नवनवीन पद्धती आणतील आणि परिषदा सेवा झटपट देऊन उद्योग नवीन जनरेशनचे रोजगार तयार करतील हे पहाण्यासाठी एआयचा वापर केला जाईल. एआय हे अभूतपूर्व वचन देते की जागतिक आव्हानांना जसे की सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण आणि शेतीत उत्पादकता वाढवणे आणि त्यासोबतच मानवी हक्कांचा आदर करणे याबाबत क्रांतिकारी आहे. एआय पद्धतींचा वापर जर उपयोगकर्ते आणि विकासक यांच्यामार्फत झाला तर समाजाला त्याचा शेवटी प्रचंड लाभ होऊ शकतो. जगात सर्वात जास्त लोकसंख्या असूनही भारतात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि डिजिटल बाजारपेठांपैकी ती सर्वात वेगाने वाढणारी आहे. मानवता, समावेशक वाढ आणि शाश्वत विकासासाठी एआयचा उपयोग केला पाहिजे असे जे भारताचे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले ते अगदीच योग्य आहे. ही शिखर परिषद राष्ट्रीय क्षमता, आर्थिक लवचिकता आणि दीर्घकालीन क्षमतांचा सक्षम देश म्हणून भारताची ओळख निश्चित करेल. अत्यंत झपाट्याने बदलत असलेल्या एआयचे जग समजण्यासाठी आणि एआयचा उद्देश्य सामान्य जनांपर्यंत पोहोचवणे हा या परिषदेचा हेतू आहे. भारत भरवत असलेल्या या परिषदेची संकल्पना आहे. सर्वजन हिताय सर्वजन सुखाय. हा हेतू सर्व काही सांगून जाणारा आहे. यावेळी परिषदेचा हेतू एआयपासून धोका हा केवळ नाही तर एआयपासून सामान्य लोकांना होणारा फायदा हाही आहे.

# संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण कार्यक्रमाच्या प्रमुखांनी घेतली ना. पंकजाताई मुंडे यांची भेट

## पर्यावरण संवर्धन ही मिशन मोडमधील कृती व्हावी

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांची आज संयुक्त राष्ट्र संघ पर्यावरण कार्यक्रमाच्या वातावरणीय बदल विभागाचे संचालक तथा जागतिक प्रमुख मार्टिन क्रुसे यांनी भेट घेऊन विविध विषयांवर व धोरणात्मक बाबींवर चर्चा केली. राज्यातील वाढते शहरीकरण आणि बदलत्या हवामानाचा विचार करता, पर्यावरण संवर्धन ही आता केवळ चर्चा न राहता ती एक 'मिशन मोड' मधील कृती असायला हवी असे श्रीमती मुंडे यांनी यावेळी बोलतांना नमूद केले.



मुंबईतील शासकीय निवासस्थान रामटेक येथे संचालक मार्टिन क्रुसे यांच्यासोबत 'बीट द हिट' मोहिमेच्या तांत्रिक आणि धोरणात्मक अंमलबजावणीवर श्रीमती मुंडे यांनी सखोल चर्चा केली. यावेळी संयुक्त राष्ट्र संघ पर्यावरण कार्यक्रमाच्या कार्यक्रम व्यवस्थापन अधिकारी बेंजामिन हिकमन, कार्यक्रम व्यवस्थापन अधिकारी मनोजकुमार एम, राज्य वातावरणीय बदल कृती कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे, वरिष्ठ सल्लागार प्राची मर्चंट यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

जागतिक स्तरावरील अनुभवांची जोड देऊन महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेवर मात करण्यासाठी एक भक्कम आराखडा तयार करण्याबाबत या दोन्ही मान्यवरांमध्ये यावेळी सकारात्मक चर्चा झाली.

वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शीतकरण ही चैनीची नव्हे तर विकासाची मूलभूत गरज असल्याचे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. शाश्वत शीतकरण सर्वांसाठी परवडणारे, ऊर्जा कार्यक्षम आणि शहरी पुनर्विकास व गृहनिर्माण आराखड्यात समाविष्ट असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उत्सर्जन वाढवणाऱ्या पारंपरिक विकासाऐवजी जिल्हास्तरीय कूलिंग प्रणाली, निष्क्रिय (पॅसिव्ह) डिझाइन पद्धती आणि ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाला प्राधान्य दिले जाणार असल्याचे मंत्री मुंडे यांनी सांगितले.

उष्णतेच्या वाढत्या जागतिक संकटाकडे लक्ष वेधताना संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचे हवामान बदल संचालक मार्टिन क्रुसे यांनीही मोठ्या प्रमाणावर राबवता येतील अशा व्यवहार्य उपाययोजनांची गरज अधोरेखित केली.

महाराष्ट्र शासनाचा ' बी कूल' प्रकल्प शहर, परिसर आणि इमारत पातळीवरील शीतकरण उपायांना चालना देणार असून त्याला तांत्रिक कौशल्य आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याची जोड मिळणार आहे. यासोबतच वैज्ञानिक नदी पुनरुज्जीवन, उपग्रहाधारित मिथेन निरीक्षण, कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती, दुग्ध व कृषी क्षेत्रासाठी अक्षय ऊर्जेवर आधारित कोल्ड चेन आणि हवामान-संवेदनशील शहरी प्रशासनावरही भर दिला जात असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

सध्या चार शहरांमध्ये 'क्लायमेट ॲक्शन सेल' कार्यान्वित झाले असून आणखी सहा शहरांमध्ये प्रक्रिया सुरू आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या दृष्टीकोनातून पर्यावरणीय संरक्षण आर्थिक विकासाला बळ देणारे ठरेल, असा विश्वास मंत्री श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केला.

# श्रीक्षेत्र सोमेश्वर हनुमान महादेव मंदिर हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील सर्वांच्या नवसाला पावणारे असे श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अतिशय मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात नऊ तारखेला झाली होती गेल्या सहा ते सात दिवसापासून श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी तसेच त्या परिसरामध्ये सर्व आनंदमय पवित्र आणि भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन या सप्ताहामध्ये धार्मिक कार्यक्रमाचे विविध आयोजकांकडून आयोजन करण्यात आले होते यामध्ये सकाळी पाच वाजता काकडा हरिपाठ गाथा भजन श्री विष्णू सहस्त्रनाम श्री भावार्थरामायण इत्यादी महान अशा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन या ठिकाणी झाले तसेच प्रवचन सायंकाळी महाराष्ट्रातील नामांकित असणाऱ्या गुन्हिजन हरिभक्त परायण महाराजांचे हरिकीर्तन या ठिकाणी संपन्न झाले त्यांनी सर्व या पंचक्रोशीतील भाविक भक्तांना आपल्या आपल्या उत्कृष्ट ज्ञानातून ज्ञान अमृत पाजले व सर्वांना भाविक भक्तांना हरिकीर्तनाने तृप्त केले असे या मंदिर परिसरामध्ये वातावरण गेल्या सहा दिवसांमध्ये पाहायला मिळाले याच सप्ताहाची सांगता सोमवारी मोठ्या उत्साहामध्ये भगवान श्री सोमेश्वर महादेवाची दिव्य भव्य अशी महापूजा रुद्राभिषेक संपन्न होऊन तसेच या ठिकाणी स्थापित असलेल्या सर्व देव त्यांचे पूजन होऊन मोठ्या उत्साहात या सप्ताहाची सांगता संपन्न झाली या वेळी बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील हजारो भाविक भक्त या ठिकाणी महाप्रसादासाठी उपस्थित होते या ठिकाणी अतिशय शिस्तीमध्ये सर्व चोक व्यवस्था मंदिर ट्रस्टीच्या वतीने श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनच्या



वतीने करण्यात आले होती या वेळी ट्रस्टीचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाची महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे मुंबई प्रदेशचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विश्वस्त यांनी असे उत्कृष्ट धार्मिक कार्यक्रमाचे या ठिकाणी आयोजन करून सर्व येणाऱ्या भाविक भक्तांचे अत्यंत उत्कृष्ट आणि अप्रतिम व्यवस्था या मंदिर ठिकाणी केली होती या ठिकाणी येणाऱ्या भाविक भक्तांना देखील ही चोख व्यवस्था पाहून मंदिर कमिटीच्या या धार्मिक कार्याच्या बाबतीत समाधान व्यक्त केले आणि सर्वांनी श्री सोमेश्वर महादेवाचे शिस्तीमध्ये दर्शन घेऊन सर्वांनी अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगतेचा महाप्रसाद सेवन केला यावेळी येथे उपस्थित असलेले मंदिर विश्वस्त तथा बीड नगर परिषदेचे नगरसेवक तथा उत्कृष्ट कायदे सल्लागार वकील गोविंद शिराळे पाटील व सर्व हजारो भाविक भक्त व श्री हनुमान मंदिर फाउंडेशन चे सर्व विश्वस्त उपस्थित होते मोठ्या संख्येने उपस्थित होते

महाशिवरात्रीच्या दिवशी प्रसिद्ध असलेल्या बीड शहरातील श्री सोमेश्वर मंदिर संस्थान येथे जवळपास बीड शहरातील जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रातील ७० ते ८० हजार भाविकांनी दर्शन घेतले तसेच आठ दिवस चालणाऱ्या सप्ताहामध्ये जवळपास ६० ते ६५ हजार भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला व श्रीक्षेत्र सोमेश्वर हनुमान मंदिर येथे जसे की साई बीड येथील संस्थान शिर्डी येथील तसेच चाकरवाडी श्री क्षेत्र नारायण गड भगवानगड पेंडगाव चा मारुती या ठिकाणी गेलेला प्रत्येक भाविक भक्त किंवा गोरगरीब भक्त जे अन्नछत्र चालवले जातेत त्या महाप्रसादाचे सेवन केल्याशिवाय जात नाहीत त्याचप्रमाणे श्रीक्षेत्र श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर संस्थान बीड येथे पण आपण भविष्यात दर सोमवारी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी आपण अन्नछत्र या ठिकाणी ठेवणार असल्याचे या श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश उपाध्यक्ष देव देश धर्म या कार्यामध्ये सातत्याने अग्रेसर असलेले असे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी या सप्ताहाच्या निमित्ताने या ठिकाणी उपस्थित असलेल्या सर्व हजारो भाविक भक्तांसमोर आपले उत्कृष्ट सुसंस्कृत मनोगत व्यक्त केले या वेळी येथे हजारो भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवजन्मोत्सवनिमित्त 'मराठा भूषण' पुरस्कार ॲड. प्रकाश कवठेकर यांना जाहीर

बीड । प्रतिनिधी

मराठा सेवा संघ, बीड जिल्हा यांच्या वतीने शिवजन्मोत्सव २०२६ निमित्त उद्योग, सहकार, सामाजिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ॲड. प्रकाश विठ्ठलराव कवठेकर यांना यंदाचा प्रतिष्ठेचा 'मराठा भूषण' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या विविध क्षेत्रांतील भरीव योगदानाची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.

ॲड. कवठेकर यांनी १९९३ मध्ये छावा संघटना चे शाखाप्रमुख म्हणून कार्यास प्रारंभ केला. संघटनात्मक बळकटी, युवकांमध्ये जनजागृती आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर त्यांनी पुढे २०१२ पर्यंत प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली.

उद्योग क्षेत्रात २००६ साली त्यांनी तेजस ग्रुपची स्थापना करून तेजस इलेक्ट्रिकल्स अँड सप्लायर्सच्या माध्यमातून विद्युत विभागात विविध प्रकल्प पूर्ण केले. गुणवत्तापूर्ण कामामुळे उद्योग क्षेत्रात त्यांनी विश्वासार्ह स्थान निर्माण केले. २०१६ मध्ये तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी ची स्थापना करून सहकार क्षेत्रात सामान्य नागरिकांना आर्थिक बळ देण्याचे कार्य सुरू केले. २०२१ साली ऑक्सितेज मिनरल वॉटर उद्योग सुरू करून स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.



राजकीय क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. २०१७ साली ते बीड जिल्हा परिषद सदस्य म्हणून बहुमताने निवडून आले. त्याच वर्षी ऑगस्ट २०१७ मध्ये त्यांची जिल्हा नियोजन समिती, बीड सदस्य म्हणून निवड झाली. जिल्हा विकास आराखडा व निधी नियोजनात त्यांनी सक्रिय भूमिका पार पाडली.

सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी महाराष्ट्र मजूर संस्था व व्यंकटेश सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले. तसेच शनी मंदिर, बीड येथे ट्रस्टी म्हणून कार्य करत धार्मिक व सांस्कृतिक कार्यात सहभाग घेतला. उखंडा येथे शिवतीर्थ गड उभारणीसाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे.

दरम्यान, हा भव्य सन्मान सोहळा दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे तहसीलदार श्री चंद्रकांत जी शेळके असतील. प्रमुख व्याख्याते म्हणून शिवश्री हनुमंत पवार मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख उपस्थितीत श्रीमती प्रिया राणी पाटील, छत्रपती राजश्री शाहू बँक चे अध्यक्ष शिवश्री अजय पाटील व जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे उपस्थित राहणार आहेत. ॲड. प्रकाश दादा कवठेकर यांच्या या सन्मानामुळे बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पान १/४ वरून

## कराडच्या घरी काम

तपासाचा प्रचंड आवाका; पण आरोपी अद्याप मोकळेच

एसआयटीने गेल्या सहा महिन्यांत सुमारे २०० लोकांची कसून चौकशी केली आहे. १५० हून अधिक संशयित आणि ५०० हून अधिक लोकांचे कॉल डिटेल्स तपासण्यात आले. महादेव मुंडे हे पिग्मी एजंट असल्याने प्रामुख्याने पैशांच्या व्यवहारातून ही हत्या झाली का, यादृष्टीने सखोल तपास सुरू आहे. यासह प्लॉटिंगचे व्यवहार, वैयक्तिक वाद आणि कौटुंबिक बाबी अशा सर्व बाजूंनी तपासाची चक्रे फिरली आहेत.

गोट्या गीतेची चौकशी आणि इतर जबाब

या प्रकरणातील संशयित गोट्या गीतेची चौकशी अद्याप बाकी आहे. त्याच्यावर मकोका लागलेला असून, तो अजूनही फरार आहे. तसेच, बाळा बांगर यांनी केलेल्या आरोपांनंतर तपासाची दिशा बदलली असली, तरी त्यातून ठोस काही हाती लागलेले नाही. एसआयटीने मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे आणि त्यांच्या भावांचे जबाब नोंदवले आहेत, मात्र त्या जबाबात नेमके काय तथ्य समोर आले, हे अद्याप गोपनीय ठेवण्यात आले आहे.

मुंडे कुटुंबाची द्विधा मन:स्थिती

मुंडे कुटुंबाने मागणी केलेलेच अधिकारी एसआयटीमध्ये देण्यात आले आहेत. मात्र, सहा महिने उलटूनही निकाल लागत नसल्याने कुटुंबाची मोठी गोची झाली आहे. ''मनासारखी टीम मिळूनही मारेकरी सापडत नाहीत,'' यामुळे आता उघडपणे नाराजी व्यक्त करणेही कठीण झाले असून, परळीत या प्रकरणाची दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे.

## सुभाष सपकाळ यांची

पान १/४ वरून

तीन दशकांपासून बीडच्या राजकारणात सक्रीय आहेत.बीड नगरपरिषद निवडणुकी दरम्यान त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला होता. आगामी काळात निवडणूक व संघटना बांधणीसाठी त्यांचा व्यापक जनसंपर्क, कार्यनिष्ठा आणि संघटनात्मक अनुभवाचा लाभ पक्षाला मोठ्या प्रमाणात होणार आहे.

जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सांगितले की, ''सुभाष सपकाळ यांच्या नेतृत्वामुळे पक्षाला नवी ऊर्जा आणि संघटनात्मक बळ मिळेल. त्यांच्या अनुभवाचा फायदा आगामी निवडणुकांमध्ये नक्कीच होईल.''

राजकीय व संघटनात्मक कार्याचा दीर्घ अनुभव लक्षात घेऊन त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष अधिक सशक्त होईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.याप्रसंगी

विष्णू भैया वाघमारे यांचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब गोरे, सरपंच धनंजय जगताप, ज्येष्ठ नेते शेषेराव तांबे, ऋतिक काळे,सरपंच नंदकुमार कुटे, पंकज बाहेगव्हाणकर, आदित्य दुधेकर, मुज्जू भाई चौधरी,मा.अमोल पारवे, आदित्य घोडके, प्रसाद सपकाळ, बाळू तात्या मिसाळ आदी उपस्थित होते .

## छत्रपती मल्टिस्टेटचे आरोपी

ठेवीदारांनी उपस्थित केला.

बुडीत निघालेल्या ज्ञानराधा, साईराम , राजस्थानी, माँसाहेब जिजाऊ, मल्टिस्टेट सह इतर पतसंस्था व मल्टिस्टेटमधील ठेवी तात्काळ परत मिळाव्यात, जप्त केलेल्या मालमत्तांचा त्वरित लिलाव करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी २४ फेब्रुवारी रोजी मुंबईत ठेवीदारांचा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. मोर्चाच्या नियोजनासह ठेवीदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी प्रा. उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली

पान १/४ वरून

मराठवाड्यात शाखानिहाय बैठका सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी परळी व माजलगाव येथेही बैठका घेण्यात आल्या होत्या. त्यानंतर शनिवारी भोकरदन व जाफराबाद येथे बैठका पार पडल्या. रविवारी गेवराईमध्ये झालेल्या बैठकीला ठेवीदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## बीडमध्ये अंबिका चौक,

मध्य रस्त्यात उभा असलेला विजेचा खांब तातडीने हलविण्याची मागणीही करण्यात आली. अंबिका चौकातील रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) अन्यत्र हलविण्याबाबत महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशीही चर्चा करण्यात आली. ही कामे लवकरात लवकर मार्गी लागण्यासाठी महावितरण कंपनीकडे सातत्याने पाठपुरावा करावा, अशा सूचना डॉ.क्षीरसागर यांनी दिल्या. यावेळी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी दोन्ही चौकातील समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन देत संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत वाहतुकीची सुलभता वाढविण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात, असेही डॉ.क्षीरसागर यांनी सांगितले. यावेळी स्थानिक नागरिकांसह भाजपचे युवा नेते नागेश तांबारे, नगरसेवक मंगेश धोंगडे, सरपंच अमोल बागलाने, राजू महुवाले, बाळासाहेब शिंदे आदी उपस्थित होते.

वाहतूक पोलिसांच्या नेमणुकीसाठी पोलीस अधीक्षकांना भेटणार

अंबिका चौक, राजीव गांधी चौक या वर्दळीच्या ठिकाणी सकाळी व संध्याकाळी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने या ठिकाणी कायमस्वरूपी वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्याबाबत पोलीस अधीक्षकांना भेटून चर्चा करणार असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

# व्यसन आणि फॅशनच्या आहारी गेल्यामुळे आजची पिढी बरबाद-उत्रेश्वर महाराज पूर्भे

### रामनगरच्या शिवजन्मोत्सवाचे केले कौतुक

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील रामनगर येथे सालाबादप्रमाणे मागील १४ वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. यंदाही हा सप्ताह भक्तिमय वातावरणात पार पडत असून सोमवार, १६ फेब्रुवारी रोजी भागवताचार्य उत्रेश्वर महाराज पूर्भे यांची कीर्तनसेवा उत्साहात संपन्न झाली.

सप्ताहाच्या पाचव्या दिवशी कीर्तन करताना भागवताचार्य उत्रेश्वर महाराज पूर्भे यांनी समाजप्रबोधनाचा प्रभावी संदेश दिला. ''व्यसन आणि फॅशनच्या आहारी गेल्यामुळे आजची पिढी बरबाद होत आहे. त्यामुळे तरुणांनी या गोष्टींपासून दूर राहून संस्कारक्षम जीवन जगावे,'' असे आवाहन त्यांनी केले. शिवजयंतीच्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहासारखा उपक्रम राबविणे हा इतरांसाठी आदर्श असल्याचे सांगत, व्यसनाधीनतेतून साजऱ्या होणाऱ्या जयंती आता थांबल्या पाहिजेत, असेही त्यांनी ठामपणे नमूद केले. कीर्तनादरम्यान त्यांनी संत तुकाराम महाराज यांच्या ''हाचि नेम आतां न फिरें माघारी ।
बैसलें शेजारीं गोविंदाचे ।।१।।
घररिघी झालें पट्टराणी बळें ।



वरीलें सांवळें परब्रम्ह ।।२।।
बळियाचा अंगसंग झाला आतां ।
नाहीं भय चिंता तुका म्हणे ।।३।।'' या अभंगावर अत्यंत सुंदर व भावपूर्ण चिंतन मांडले. अभंगाच्या माध्यमातून भक्ती, निष्ठा आणि ईश्वरनिष्ठ जीवनाचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. यावेळी शिवाजी महाराज नेवडे, आण्णा महाराज शेळके, निर्गुण महाराज गव्हाणे, मसुराम महाराज कदम, परमेश्वर महाराज माने, रावसाहेब महाराज मेखले, साहेबराव महाराज नेहराळे, मृदुंगाचार्य रमेश महाराज पिसाळ, आकाश महाराज मस्के, साहेबराव महाराज पिसाळ, कृष्णा महाराज वेताळ, बाळकृष्ण महाराज मोरे, सखाराम महाराज खरसाडे, रामनाथ महाराज चव्हाण, आण्णा महाराज भडके (चोपदार), बाळू महाराज बाबर तसेच विद्यानेश्वर वारकरी संस्थेतील छोटे वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रामनगर येथील अखंड हरिनाम सप्ताहामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, शिवजयंती निमित्त समाजाला सकारात्मक दिशा देणारा हा उपक्रम ठरत आहे.

आज बिभीषण महाराज आंधुरे यांचे कीर्तन

आज मंगळवार, १७ फेब्रुवारी रोजी रात्री ९ ते ११ यावेळेत विनोदाचार्य बिभीषण महाराज आंधुरे यांची कीर्तन सेवा होणार आहे. तरी पंचक्रोशितील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन रामनगर ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

## श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान, कुर्ला येथे महाशिवरात्री सप्ताहाची भक्तीमय सांगता

कुर्ला । प्रतिनिधी

श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान महादेव मळी येथे महाशिवरात्रीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सप्ताहाची सांगता दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी अत्यंत भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या सप्ताहाच्या निमित्ताने कुर्ला तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांना महाराष्ट्रातील विविध संतांचे विचार, अध्यात्मिक संदेश आणि कीर्तनरूपी मार्गदर्शन ऐकण्याची संधी लाभली. सप्ताहभर धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन व प्रवचनांमुळे परिसरात भक्तीचा



दरवळ निर्माण झाला होता. विशेष म्हणजे, या सप्ताहादरम्यान परिसरातील भाविकांना वाराणसी (काशी) येथील पद्मश्री गणेश्वरशास्त्री द्राविड गुरुजी यांच्या दर्शनाचा लाभही मिळाला. त्यांच्या उपस्थितीमुळे सप्ताहाला अधिक आध्यात्मिक अधिष्ठान लाभले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी काल्याच्या कीर्तनाची सेवा मठाधिपती ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मस्के यांनी केली. आपल्या प्रभावी कीर्तनातून त्यांनी सुसंगतीचे महत्त्व, अध्यात्मातील विविध विषय तसेच ''भगवंताचे स्मरण व सत्संग जीवनात किती आवश्यक आहे'' यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्या ओजस्वी वाणीने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहून महादेवाचे दर्शन घेतले. संपूर्ण परिसर ''हर हर महादेव''च्या जयघोषाने दुमदुमून गेला.

संगमेश्वर संस्थानच्या वतीने सप्ताह यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्व भक्त, ग्रामस्थ व सेवेकऱ्यांचे आभार मानण्यात आले. अशा धार्मिक उपक्रमांमुळे समाजात आध्यात्मिक वातावरण निर्माण होऊन सामाजिक एकोपा दृढ होतो, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## महाशिवरात्रीतून सामाजिक सलोख्याचा संदेश : व्यसन करू नका, नीतीने कमवा -मनोज जरांगे

कुर्ला (प्रतिनिधी) महाशिवरात्रीनिमित्त श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान कुर्ला येथे संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी भेट देत समाजाला सकारात्मक आणि प्रबोधनपर संदेश दिला.

आपल्या भाषणात त्यांनी सामाजिक सलोखा जपण्याचे आवाहन करत धार्मिक कार्यक्रमांमध्ये जाती-पातीवर कोणीही बोलू नये, अशी ठाम भूमिका मांडली. ''धर्माच्या व्यासपीठावरून समाज एकत्र यावा, फूट पडू नये,'' असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले.

व्यसनमुक्ती व नीतीमूल्यांचा संदेश-

जरांगे पाटील यांनी विशेषतः युवकांना व सर्व समाजबांधवांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. ''दारू व इतर व्यसनांनी कुटुंब आणि समाज दोन्ही उद्ध्वस्त होतात. व्यसन करू नका,'' असा ठाम संदेश त्यांनी दिला.

तसेच संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील '' जोडोनिया धन उत्तम व्यवहारे''



या ओळीचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, प्रत्येकाने प्रामाणिक मार्गाने आणि नीतीने धन कमवावे; चुकीच्या मार्गाने कमावलेले धन कधीही सुख देत नाही.

तरुणांनी कामाची लाज बाळगू नये.

तरुणांनी आपल्या घरच्या कामात मदत करावी तसेच शेतीसह कोणतेही प्रामाणिक काम करताना लाज बाळगू नये, असेही त्यांनी सांगितले. ''कष्टाला कधीही कमीपणा समजू नका; परिश्रम हीच खरी ताकद आहे,'' असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी संस्थानचे मठाधिपती पुरुषोत्तम महाराज मस्के, दत्ता महाराज बडगे तसेच कुर्ला गाव व पंचक्रोशीतील हजारो नागरिक उपस्थित होते.महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वावरून समाजामध्ये व्यसनमुक्ती, प्रामाणिकपणा व सामाजिक एकतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम ठरला.

## डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त गृहशास्त्र विभागातर्फे पोषण व आरोग्य आणि सामान्य ज्ञान स्पर्धा

**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे माजी नगरध्यक्ष तथा नवगण शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त गृहशास्त्र विभागाच्या वतीने पोषण व आरोग्य या विषयावर सामान्यज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली. समाजामध्ये आत्ताच्या काळात तरुण पिढीमध्ये सुध्दा उच्च रक्तदाब, मधुमेह, ह्रदयरोग यांचे प्रमाण वाढत आहे. खाण्याच्या अयोग्य सवयी, पोषण विषयक अज्ञान व जीवन शैलीतील बदल यामुळे तारुण्यावस्थेत विविध विकार जडत आहेत या उद्देशाने विद्यार्थ्यांमध्ये व



समुदायामध्ये पोषण विषयक जनजागृती येण्यासाठी व विद्यार्थ्यांचे पोषण विषयक ज्ञान वाढविण्यासाठी हा सामाजिक उपक्रम घेण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फुर्त सहभाग नोंदवला.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेकरीता गृहशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वंदना फटाले, प्रा. शाम कुरे, डॉ. दादासाहेब खोगरे यांनी स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येणार आहे.


# मराठा सेवा संघाचे मराठा भूषण पुरस्कार जाहीर!

**बीड । प्रतिनिधी**

**मराठा सेवा संघ बीड व अंतर्गत सर्व कक्ष यांच्या वतीने दरवर्षी शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो या वर्षीही शिवजन्मोत्सव सोहळा दि. २०/२/२०२६ वार शुक्रवार रोजी ठीक सायं. ७ वा यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड या ठिकाणी संपन्न होत आहे.कार्यक्रम प्रसंगी विविध क्षेत्रात कार्यरत समाजातील तळागाळातील व्यक्तीसाठी योगदान देणाऱ्या समाज रत्नांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे.**





शिवजन्मोत्सव सोहळ्यात मराठा भूषण पुरस्काराने सामाजिक क्षेत्रात अतुलनीय कार्य करणारे शिवश्री डॉ.गणेश ढवळे, वैद्यकीय क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे प्रसिद्ध बाल रोगतज्ञ शिवश्री डॉ.प्रदीप शेळके,सामाजिक व उद्योग क्षेत्रातील शिवश्री प्रकाश कवठेकर,महिला मधून जिजाऊरत्न पुरस्काराने शिवमती जयश्रीताई पांडुरंग सावंत तसेच विशेष गौरव पुरस्काराने समाज प्रबोधनकार शिवश्री संतोष डोंगरे व प्रशासकीय क्षेत्रातून शिवश्री मधुकर शेळके यांना मान्यवरांच्या हस्ते मराठा समाजभूषण पुरस्कार देवून गौरव करण्यात येणार आहे.

यावेळी प्रसिद्ध व्याख्याते शिवश्री हनुमंत पवार यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे तहसीलदार मा.चंद्रकांत शेळके साहेब हे असून या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्ह्याच्या माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी शिवमती प्रियारणी पाटील,शिवश्री अजय पाटील अध्यक्ष छत्रपती शाहू महाराज नागरी सहकारी बँक बीड, बीड जिल्हा हिवताप अधिकारी शिवश्री विजयसिंह शिंदे ,मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष शिवश्री अशोक ठाकरे हे उपस्थित राहणार आहेत.या सर्व मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये मान्यवरांना मराठा समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तरी सर्व शिवप्रेमींनी शिवजन्मोत्सव व मराठाभूषण पुरस्कार सोहळयास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन मराठा सेवा संघ बीड,जिजाऊ ब्रिगेड ,संभाजी ब्रिगेड व अंतर्गत सर्व कक्षाच्या वतीने करण्यात येते.

# मिलिया हायस्कूलचे ज्येष्ठ शिक्षक हाजी सय्यद अजहर सर यांचा भव्य सेवानिवृत्ती सत्कार सोहळा

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

येथील नामांकित शिक्षण संस्था 'मिलिया हायस्कूल'चे पदवीधर शिक्षक हाजी सय्यद अजहर सर हे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त संस्थेच्या वतीने त्यांचा गौरवपूर्ण सत्कार करून भावपूर्ण निरोप देण्यात आला. बुधवारी (दि. ११ फेब्रुवारी) आयोजित या कार्यक्रमाला परळी शहरातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती होती.

३६ वर्षांच्या निस्पृह सेवेचा गौरव

सय्यद अजहर सर यांनी १९८९ मध्ये मिलिया हायस्कूलमध्ये आपल्या शिक्षक पेशाला सुरुवात केली होती. ३१ जानेवारी २०२६ रोजी ते वयोमानानुसार



सेवानिवृत्त झाले. तब्बल ३६ वर्षे ६ महिने त्यांनी या संस्थेत ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. कार्यक्रमादरम्यान विविध शिक्षकांनी अजहर सरांच्या शिस्तीबद्दल आणि त्यांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. शाळेप्रती असलेली त्यांची तळमळ आणि विद्यार्थ्यांविषयीचे प्रेम याचे अनेक हृदयस्पर्शी किस्से यावेळी सहकाऱ्यांनी विशद केले.

शाळा हेच माझे कुटुंब - हाजी अजहर सर

सत्काराला उत्तर देताना हाजी अजहर सर भावूक झाले होते. ते म्हणाले की, ''मी या शाळेला कधीही नोकरीचे ठिकाण मानले नाही, तर ती माझ्यासाठी एक परिवार आहे. आज संस्थेने जो माझा कौटुंबिक सन्मान केला आहे, तो माझ्या स्मरणात कायम राहील.'' त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सर्व सहकाऱ्यांच्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

मान्यवरांची उपस्थिती आणि शुभेच्छा

मिलिया संस्थेच्या सचिव सबिया खान बाजी या कामानिमित्त परदेशी असल्याने प्रत्यक्ष उपस्थित राहू शकल्या नाहीत, मात्र त्यांनी मोबाईलद्वारे शुभेच्छा संदेश देऊन सरांच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमास उपस्थित प्रमुख मान्यवर:

अब्दुल गणी सर (मुख्याध्यापक, मिलिया हायस्कूल) अजीज खान सर (मुख्याध्यापक, मिलिया प्रायमरी) इरशाद सर (प्राचार्य, मिलिया कनिष्ठ महाविद्यालय, अंबाजोगाई) जमील सर (मिलिया प्राथमिक शाळा, अंबाजोगाई)

मुनवरी बाजी (प्राचार्या, मिलिया ज्युनिअर कॉलेज, परळी)

जरीना बाजी (प्राथमिक शाळा, परळी) शेख सुलतान सर (बिलाल हायस्कूल, परळी) डॉ. झाकीर हुसेन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, अंजुमन महाविद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक, कर्मचारी वर्ग आणि अजहर सर यांचे कुटुंबीय.

या निरोप समारंभाने परळीच्या शैक्षणिक वर्तुळात एक भावनिक वातावरण निर्माण झाले होते.

## ढेकणमोहा तांडा येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**ढेकणमोहा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील ढेकणमोहा तांडा येथे बंजारा समाजाचे आद्यदैवत, थोर तत्वज्ञ, महान विचारवंत, समाजसुधारक श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती प्रतिवर्षा प्रमाणे साजरी करण्यात आली यां प्रसंगी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार पिपळनेर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मधुसूदन घुगे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी चंदकांत फड बीड जिल्हा कोषाध्यक्ष भाजप, भाऊराव नाना सुरवसे, डॉ. अमोल घुमरे सर, उद्धव दादा म्हेत्रे, बाबासाहेब काळे, नागेश शिंदे माजी सरपंच ढेकणमोहा, विष्णू पवार माजी



सरपंच ढेकणमोहा तांड, साहेबराव पवार माजी उपसरपंच, दयाराम पवार सरपंच, जेष्ठ सदस्य गोवर्धन पवार उपसरपंच बाजीराव पवार, भागवत खाकरे, अविनाश गवळी, नवनाथ धुमाळ, युवा नेते कैलास पवार, बाजीराव पवार, ,, नवनाथ आडे, देवीदास पवार, हरिभाऊ पवार, एकनाथ आडे, सुभाष आडे, रघुनाथ पवार, सुभाष पवार, शेषेराव पवार, नवनाथ नाथा पवार, धनु पवार, यादव पवार, सखुबाई पवार, मथुराबाई पवार, सुंदराबाई पवार, राधाबाई पवार, तुळसाबाई पवार, यशोदा पवार आदी मान्यवर व ग्रामस्थ, महीला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिव जन्मोत्सवानिमित्त आरोग्य व रक्तदान शिबिराचे आयोजन

### शिवजन्म स्वत: सामील होऊन आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा-महेश शिंगण

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधत सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त दरवर्षी विविध कार्यक्रम राबवणाऱ्या क्षत्रिय जाणता राजा युवा प्रतिष्ठानतर्फे यंदाही आरोग्य व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जाणता राजा युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश शिंगण यांनी सामाजिक बांधिलकी जपत बार्शी नाका, परळी रोड प्रीतम इंटरनेट कॅफे समोर दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे शिवजयंती दिनी होणाऱ्या या उपक्रमात सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी तसेच रक्तदान शिबिर राबविण्यात येणार आहे. शिवजन्मोत्सव हा केवळ उत्सव न राहता तो समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा व्हावा, हा प्रतिष्ठानचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

यापूर्वीप्रमाणे याही वर्षी भाषण स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि इतर सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा व रक्तदान करून समाजासाठी योगदान द्यावे, असे आवाहन महेश शिंगण यांनी केले आहे.बार्शी नाका भागात होणाऱ्या या उपक्रमामुळे शिवजयंतीला सामाजिक कार्याची जोड मिळणार असून नागरिकांकडून या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा युवा नेते महेश शिंगण यांनी व्यक्त केली आहे.

# अमेरिका करारामुळे कापूस - सोयाबीन भाव कोसळले-राजेंद्र आमटे

**बीड । प्रतिनिधी**

भारत- अमेरिका करार हा शेतकऱ्यांच्या मुळावर आहे भारतात कापूस सोयाबीन भाव सुधारत असताना अमेरिके सोबत केलेल्या करारामुळे कापूस व सोयाबीन पिकाचे भाव कोसळण्यास भारत अमेरिका करार जबाबदार आहे

भारत अमेरिका यांच्या कृषी करार करण्यात आला या करतात अमेरिकेतील कापूस, सोयाबीन, दूध, मका, गहू, फळ भारत विक्रीसाठी येणार आहेत अमेरिकेतून भारतात येणाऱ्या मालावर ०% कर व भारतातील शेतकरी अमेरिकेत माल घेऊन गेल्यावर भारतीय शेतकऱ्यांना १८% कर का? हा अन्याय नाही का?

भारत अमेरिका करार हा द्विपक्षीय करार नसून हा अमेरिकेने भारतावर लाभलेला करार आहे हा भारतातील शेतकऱ्याला उध्वस्त करणारा करा भारत



शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने कराराची होळी

सरकारने रद्द करण्यात यावा भारत हे सार्वभौम राष्ट्र आहे भारताने अमेरिकेत समोर झुकण्याची कसल्याही प्रकारची गरज नसताना हा करार शेतकऱ्यावर लादला जात आहे यामुळे शेतकरी देशोधलेला लागेल यामुळे शेतकरी हक्क मोर्चा या कराराच्या विरोधात आहे

भारत अमेरिका करार तत्काळ रद्द करण्यात यावा हा करार शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा आहे या मुळे भारतातील कापूस सोयाबीन दूध मका गहू फळ या पिकांचे भाव कोसळणार आहेत हा मुळे शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने अमेरिका कराराची होळी करण्यात आली हा करार तत्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली या वेळी शेतकरी यांनी भारत अमेरिका करार रद्द झालाच पाहिजे घोषणबाजी करण्यात आली या वेळी शेतकरी हक्क मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, राहुल साळुंके, ईश्वर साळुंके, बिभीषण जवंजाळ, इम्रान पठाण, दत्ता जगताप, प्रदीप साळुंके,दादाराव जाधव, किशोर थोरात, संतोष आमटे, लखन आमटे, सचिन आमटे, संतोष आमटे, बलभीम सपकाळ, समाधान घोडके, मधुकर सपकाळ,दत्ता सुरवसे , ईश्वर आमटे, आदी शेतकरी उपस्थित होते

चौकट:- शेतकरी हक्क मोर्चा हा जिल्हाभर शेतकरी जागृती अभियान राबवणार आहे का करार शेतकऱ्यांच्या मुळावर आहे यासंदर्भात शेतकरी जागृती करणार आहे.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande Email-prarambh2023@gmail.com

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे Email-prarambh2023@gmail.com




सायं.दैनिक
बीड
प्रारंभ
मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६






# पोद्दार इंग्लिश स्कूलचे अल्पसंख्यांक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करा -मनोज जाधव

## आजपासून आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरु; जिल्ह्यात २ हजार ४०० विद्यार्थ्यांना मिळणार आरटीई अंतर्गत मोफत प्रवेश मनोज जाधव



बीड । प्रतिनिधी

**शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांसाठी राबविण्यात येणाऱ्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला आज मंगळवार (दि. १७ फेब्रुवारी) पासून सुरुवात होत आहे. त्यानुसार पालकांना मुलांचे अर्ज १० मार्चपर्यंत भरता येणार असल्याची माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे.**

आर्थिक दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हक्क कायद्यानुसार इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. यंदाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ९ जानेवारी रोजी शाळा नोंदणी प्रक्रिया सुरू झाली होती. मुदतवाढीसह ही प्रक्रिया ३० जानेवारी रोजी बंद करण्यात आली. जिल्ह्यात प्रवेशासाठी २१३ शाळांची नोंदणी झाली असून २ हजार ४०० जागा उपलब्ध आहेत. मंगळवारपासून प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होत असून पात्र पालकांनी आपल्या पाल्याचे अर्ज वेळेत दाखल करावेत, असे आवाहन मनोज जाधव यांनी केले आहे.

पोद्दार इंग्लिश स्कूलचे अल्पसंख्यांक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करा - मनोज जाधव

पोद्दार इंग्लिश स्कूलने आरटीई प्रवेशातून पळवाट काढण्यासाठी अल्पसंख्यांक प्रमाणपत्र घेतले असून हे प्रमाणपत्र नियमबाह्य पद्धतीने शासनाकडून देण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. शाळा सुरू झाल्यानंतर आरटीई प्रवेश टाळण्यासाठी अशा प्रकारे प्रमाणपत्र देणे चुकीचे असल्याचे मत मनोज जाधव यांनी व्यक्त केले आहे. या संदर्भात मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री व शिक्षण संचालक यांच्याकडे रीतसर तक्रार दाखल करण्यात आली असून संबंधित शाळांना देण्यात आलेले अल्पसंख्यांक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करावे, अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.

यंदा कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य

आरटीई प्रवेशासाठी काही पालकांकडून कागदपत्रांमध्ये अफरातफर झाल्याचे प्रकार यापूर्वी उघडकीस आले होते. त्यामुळे यंदा शिक्षण विभागाने अर्ज भरतानाच आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करणे अनिवार्य केले आहे.

महत्त्वाच्या सूचना

* आरटीई पोर्टलवर निवासस्थानापासून १ कि.मी. किंवा त्यापेक्षा कमी अंतरावरील शाळांची माहिती दिसेल. * एकापेक्षा अधिक अर्ज भरल्यास कोणताही अर्ज लॉटरी प्रक्रियेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही. * पालकांना किमान दहा शाळांची निवड करावी लागेल. * केवळ मेसेजवर अवलंबून न राहता पोर्टलवरील सूचनांचे पालन करावे. * चुकीची माहिती दिल्यास कोणत्याही टप्प्यावर प्रवेश रद्द करण्यात येईल.

* अर्ज भरताना निवासस्थानाचा पत्ता अचूक नमूद करणे आवश्यक आहे.

ही कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य

१) आई किंवा वडिलांचे आधार कार्ड

२) बालकाचे जन्मप्रमाणपत्र व वास्तव्याचा पुरावा ३) भाडेतत्त्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत (सर्व संबंधित घटकांसाठी अनिवार्य) ४) सामाजिक वंचित घटकांसाठी पालकांचा/बालकाचा जात दाखला व अपंगत्वाचे प्रमाणपत्र (परराज्यातील जात प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.)

५) आर्थिक दुर्बल घटकांसाठी पालकांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला रुपये एक लाखांपेक्षा कमी (सन २०२३-२४ किंवा २०२४-२५ या वर्षातील दाखला ग्राह्य)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ अवैध धंद्यांवर ऑल इंडिया पँथर सेनेची तीव्र कारवाईची मागणी -नितीन सोनवणे

बीड । प्रतिनिधी

शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील परिसरात मटका जुगार, सुरट-सट्टा, क्रिकेट व इतर खेळांवरील सट्टेबाजी आणि अवैध देशी-विदेशी दारू विक्री व सेवन यासारखे गंभीर अवैध धंदे उघडपणे चालू असल्याची तक्रार ऑल इंडिया पँथर सेनेने आज जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे निवेदनाद्वारे केली आहे.ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असलेला हा परिसर आदरस्थळ आहे. येथे समाजातील तरुण, विद्यार्थी, महिला आणि सर्वसामान्य नागरिक ये-जा करतात. मात्र, दुर्दैवाने या ठिकाणी आणि आजूबाजूच्या परिसरात मटका जुगार, सुरट-सट्टा, अवैध दारू विक्री यासारखे अवैध क्रियाकलाप मोठ्या प्रमाणात चालू आहेत. लोक उघडपणे जुगार खेळतात, पैसे लावतात आणि दारूचे सेवन करतात.या अवैध धंद्यांमुळे परिसरात गोंधळ, भांडणे, तरुणांचे भ्रष्टन, कुटुंबांमध्ये आर्थिक हानी, गुन्हेगारी वाढ आणि महिलांची असुरक्षितता यासारख्या समस्या निर्माण होत आहेत. हे सर्व कृत्य भारतीय दंड संहिता, महाराष्ट्र प्रोहिबिशन कायदा, जुगार कायदा इत्यादी कायद्यांचे उल्लंघन करणारे आहेत. महापुरुषांचा पुतळा असताना असे अवैध धंदे चालणे हे त्यांच्या विचारांना आणि संपूर्ण समाजाला



अपमानास्पद आहे.त्यामुळे या अवैध धंद्यांवर तात्काळ छापे टाकून संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करावी आणि हा परिसर पूर्णपणे स्वच्छ व सुरक्षित करण्यात यावा, अशी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने तीव्र विनंती करण्यात आली आहे. निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर कारवाई करण्याची मागणी केली आहे.याप्रसंगी ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, आनंद डोंगरे, राजेश वडमारे, गणेश कसबे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.ऑल इंडिया पँथर सेना नेहमीप्रमाणे समाजातील अन्याय, अत्याचार आणि अवैध क्रियाकलापांविरोधात आक्रमक भूमिका घेत असून, या प्रकरणातही त्वरित पोलीस प्रशासनाकडून कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नगरपरिषद सीओ, बदली मागू नका! बीड शहर बचाव मंचाची शैलेश फडसे यांना विनंती

बीड । प्रतिनिधी

बीड शहर बचाव मंचाच्या वतीने विविध पक्षांचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी (सीओ) शैलेश फडसे यांची भेट घेऊन त्यांनी बदली मागू नये, अशी विनंती केली. बीड शहराच्या विकासासाठी त्यांच्या कार्यपद्धतीची आवश्यकता असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

सीओ शैलेश फडसे यांनी बीडमध्ये रुजू झाल्यापासून नगरपरिषदेच्या कामकाजात शिस्त व पारदर्शकता आणण्यासाठी प्रभावी पावले उचलली आहेत. गत मुख्याधिकारी यांच्या कार्यकाळानंतर नगरपालिकेचा कारभार सुरळीत करण्याचे मोठे आव्हान त्यांच्या समोर होते. मात्र, त्यांनी कर्तव्यदक्ष आणि




नियोजनबद्ध पद्धतीने प्रशासनाची धुरा सांभाळत कामकाजाला गती दिली आहे. नगरपरिषदेच्या कार्यप्रणालीत सुधारणा घडवून आणण्याचे त्यांचे प्रयत्न आता फलदायी ठरत असल्याचे चित्र दिसत आहे.

विशेषतः नगरपरिषद व्यवस्थेत रूढ झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रवृत्तींवर आळा घालण्यासाठी तसेच बोगस कंत्राटदार व बोगस बिलांविरोधात उघडलेल्या मोहिमेबद्दल बीड शहर बचाव मंचाच्या वतीने त्यांचे मनापासून कौतुक करण्यात आले. त्यांच्या धाडसी आणि निडर भूमिकेमुळे प्रशासनात सकारात्मक बदल होत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

''आपण अशाच धैर्याने व प्रामाणिकपणे काम करत राहा. कोणत्याही संकटाच्या वेळी आम्ही आपल्या पाठीशी ठामपणे उभे राहू,'' असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त करून त्यांचे मनोबल वाढविले.

यावेळी नगर रोड माने कॉम्प्लेक्स परिसरातील उद्यानाच्या समस्या, काही भागांतील स्ट्रीट लाईट अडचणी तसेच सय्यद अलीनगर येथील दीर्घकाळ प्रलंबित प्रश्नांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील मूलभूत सुविधांबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

सीओ शैलेश फडसे यांनी आतापर्यंत विविध शहरांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तसेच नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत निवडणूक अधिकारी म्हणून बजावलेल्या उत्कृष्ट कर्तव्याबद्दल त्यांचा अभिनंदनपर सत्कार करण्यात आला.

बीड शहराला पूर्णवेळ व जबाबदारीने काम करणाऱ्या अधिकाऱ्याची आवश्यकता असून, फडसे यांसारख्या कार्यक्षम अधिकाऱ्यांमुळे प्रशासनावर नागरिकांचा विश्वास दृढ होत असल्याचे मत बैठकीत व्यक्त झाले. या बैठकीस बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये, कायदेशीर सल्लागार ॲड. अनिल बारगजे, एसडीपीआय पक्षाचे जिल्हा सचिव अब्दुल कादर, आपचे शहराध्यक्ष सादेक सय्यद, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य भूषण पवार, सामाजिक कार्यकर्त्या आम्रपाली साबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक प्रमोद शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.







